1 - APR 2017
तरूण भारत
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी भाषेचा वापर सर्वच क्षेत्रात केला पाहिजे

## डॉ. नागनाथ कोतापल्ले यांचे प्रतिपादन : विद्यापीठात प्रा. डॉ. रवींद्र ठाकूर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

'मातृभाषा म्हणून मराठी ही केवळ विषयापुरती मर्यादित नाही; तर सर्वच क्षेत्रात मराठी भाषेचा वापर केला पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोतापल्ले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विभागाचे प्रा. डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या सेवानिवृत्तीबद्दल त्यांचा व त्यांच्या पत्नी नलीनी ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. 'महाविद्यालयीन स्तरावरील मराठीचे अध्यापन" या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्रात अनेक मान्यवरांनी निबंध वाचन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मराठीचे माजी विभागप्रमुख डॉ. कृष्णा किरवले, ज्येष्ठ साहित्यिक गोविंद तळवलकर यांना आदरांजली वाहण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे डॉ. रवींद्र ठाकूर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करताना डॉ. नागनाथ कोतापल्ले. सोबत डावीकडून डॉ. नलिनी पाटील, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, डॉ. राजन गवस.

डॉ. कोतापल्ले म्हणाले, "मराठीच नव्हे; तर सर्वच विषयांत नवीन बदल करण्याची गरज आहे. आधुनिक जगात ज्ञान विकसित करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. तसेच भारतीय शाखांनी एकत्र येऊन समन्वयातून पुन्हा नवीन ज्ञानशाखा निर्माण करण्याची गरज आहे. जागतिक पातळीवर नवनवीन संशोधन होत असताना, प्राध्यापक मात्र आपले वर्कआऊट, शासनाने दिलेले वेतन यातच गुरफटले आहेत. यातून बाहेर पडून मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार केला पाहिजे.

कोतापल्ले पुढे म्हणाले, "डॉ. रवींद्र ठाकूर यांची साहित्यिक, समीक्षक, कवी म्हणून महाराष्ट्रात ओळख आहे. आजवर राहून गेलेले वाचन आणि लिखाण करण्यासाठी सेवानिवृत्तीनंतर त्यांना भरपूर वेळ मिळणार आहे. त्यांनी लिहिलेल्या 'महात्मा" कादंबरीचा अनुवाद इंग्रजीसह इतर भाषांतही झाल्यामुळे महात्मा फुले यांच्या कार्याचे महत्त्व जगभर अधोरेखित होणार आहे. 'साहित्यिक एकदा लिखाण किंवा वाचन करायला लागला, की त्याला कोणतेच भान राहत नाही. अशा स्थितीत डॉ. ठाकूर यांना त्यांची पत्नी नलिनी ठाकूर यांनी साथ दिली. पतीच्या यशामध्ये त्यांचे मोलाचे सहकार्य आहे," अशा शब्दांत कोतापल्ले यांनी सौ. ठाकूर यांचे कौतुक केले.

डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. शिवकुमार सोनाळकर यांनी आभार मानले. दिवसभरात लता मोरे, गोपाळ वाघमारे, शिवलिंग मेनकुदळे, राजा माळगी, सुभाष वाघमारे, आनंद बल्लाळ, सुहास बोबडे, अमोल चांदेकर, विनोद कांबळे, चंद्रकांत पोतदार, एकनाथ पाटील, दत्ता डांगे यांनी निबंध वाचन केले. यावेळी डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. जी. पी. माळी, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. रणधीर शिंदे, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क अधिकारी
1 - APR 2017 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : 'लाइफ सायन्सेस' विषयात नेट उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींच्या सत्कारप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह मान्यवर.

# प्राणिशास्त्र अधिविभागातील चार विद्यार्थिनी नेट उत्तीर्ण

कोल्हापूर, ता. ३१ : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातील चार विद्यार्थिनी एकाच वेळी 'लाइफ सायन्सेस' विषयात नेट परीक्षा उत्तीर्ण झाल्या. त्यातील दोघींनी गेट परीक्षाही उत्तीर्ण केली, तर अन्य दोघींनी ज्युनिअर रिसर्च फेलोशिपसुद्धा मिळविली.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते त्यांचा नुकताच सत्कार झाला. नम्रता जाधव (जे.आर. एफ. नेट, गेट), ऋतुजा बेहरे (जे.आर.एफ. नेट), रेखा शिंदे (नेट, एल. एस. गेट) आणि काजल चाफेकर (नेट, एल. एस.) यांचा यात समावेश आहे. या विद्यार्थिनी प्राणीशास्त्र अधिविभागातून २०१६ मध्ये एम.एस्सी. उत्तीर्ण झाल्या आहेत. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रा. डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. डी. जाधव, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. ए. देशमुख उपस्थित होते.